

दैनिक

हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सुट्टीची सूचना

दि. १०, ११ नोव्हेंबर २०२६ रोजी पाडवा व भाऊबीज निमित्त दै. हिंदू प्रकाश वार्ता कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे दि. ११, १२ नोव्हेंबर २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १९८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; शासन खंबीरपणे पाठिशी - एकनाथ शिंदे

भिलपुरीत शेतकरी कुटुंबासोबत दिवाळी साजरी; अंबादास तांगडे यांच्या मुलीच्या शिक्षणासह विवाहाची जबाबदारी स्वीकारली

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : राज्यात दुष्काळाचे संकट निर्माण झाले असले, तरी शेतकरी बांधवांनी खचून जाऊ नये. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असून, त्यांना आवश्यक ती सर्व मदत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिली जाईल. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना तालुक्यातील भिलपुरी येथे दिली.

जालना तालुक्यातील भिलपुरी येथील दुष्काळग्रस्त शेतकरी अंबादास तांगडे यांच्या घरी भेट देऊन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी तांगडे कुटुंबीयांशी संवाद साधत शेतीची परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची माहिती घेतली. याप्रसंगी त्यांनी कुटुंबासोबत पारंपरिक बेसन, बाजरीची भाकरी, गावरान ठेचा आणि चटणी अशा ग्रामीण जेवणाचा आस्वाद घेतला.

यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, मी देखील शेतकरी कुटूंबातील आहे. त्यामुळे तांगडे यांच्या घरी आल्यासारखे वाटत नसून स्वतःच्याच घरी आल्याची भावना आहे. शेतकऱ्यांवर मोठे संकट आले असून, या परिस्थितीत समाजातील प्रत्येकाने मदतीचा हात पुढे करणे आवश्यक आहे. शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला असून, अनेक शेतकऱ्यांच्या खात्यांत ही रक्कम जमा झाली आहे. तसेच दुष्काळ जाहीर केल्यानंतर बारा कलमी सवलतींची अंमलबजावणी करण्यात येत आहे. नुकसान भरपाईसह पीक कर्जाचे पुनर्गठन, सक्तीच्या वसुलीला स्थगिती, शैक्षणिक शुल्कात सवलत आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे.



अंबादास तांगडे यांच्याकडे केवळ एक एकर शेती असून, पत्नी मंदाबाई, दोन मुली, एक मुलगा आणि आई अशा कुटुंबाचा उदरनिर्वाह या शेतीवर अवलंबून आहे. कुटूंबाची परिस्थिती जाणून घेतल्यानंतर शिंदे यांनी तांगडे यांच्या मुलीशी संवाद साधला. तिला भविष्यात पोलीस अधिकारी व्हायचे असल्याचे समजल्यानंतर तिच्या शिक्षणापासून विवाहापर्यंतची संपूर्ण जबाबदारी स्वीकारत असल्याचे त्यांनी जाहीर केले.

याशिवाय दुष्काळग्रस्त भागातील ज्या शेतकरी कुटूंबांतील मुलींचे विवाह ठरले आहेत, अशा कुटूंबांची माहिती संकलित करून सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्याचा निर्णयही त्यांनी यावेळी जाहीर केला. शेतकरी कुटूंबांना आधार देण्यासाठी महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन, विद्यार्थिनींना सायकली आणि गरजू कुटूंबांना दिवाळीचा शिधा देण्याचे उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आगामी पावसाळ्यापर्यंत दुष्काळग्रस्त भागात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी, चारा आणि अन्नधान्य उपलब्ध राहावे, यासाठी शासन नियोजन करीत आहे. केंद्र सरकारही महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकरी हा शासनाच्या तिजोरीवरील पहिला हक्कदार असून, त्याला मदत करताना सरकार कोणतीही कमतरता ठेवणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी धीर सोडू नये आणि कोणताही टोकाचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

भाऊबीजेनिमित्त मंदाबाई तांगडे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे औक्षण केले. त्यानंतर शिंदे यांनी तांगडे कुटूंबातील सर्व सदस्यांना कपडे भेट दिले. यावेळी मंदाबाई यांनी त्यांना दहा किलो ज्वारी आणि दहा किलो बाजरी तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. शासनाचे प्रमुख पदावरील व्यक्ती आपल्या घरी येऊन सुख-दुःखाची विचारपूस करतात, ही समाधानाची बाब असल्याची भावना अंबादास तांगडे यांनी व्यक्त केली.

यानंतर मौजपुरी गावातील महादेव मंदिर परिसरात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकरी, शेतमजूर आणि महिलांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेत दिवाळीचा फराळ व शिधा देऊन महिलांचा सन्मान केला.

या वेळी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, उद्योगमंत्री उदय सामंत, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खासदार संदीपान भुमरे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार हिकमत उढाण यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शेतकरी, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'युद्ध थांबवा, इराणचा अमेरिकेला थेट अल्टिमेटम

वॉशिंग्टन : अमेरिका (America) आणि इराणमधील (Iran) भू-राजकीय संघर्ष आता अत्यंत धोकादायक वळणावर येऊन ठेपला आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची (Abbas Aragh) यांनी अमेरिकेसमोर ४८ तासांचा युद्धविरामाचा प्रस्ताव ठेवतानाच एक खळबळजनक इशारा दिला आहे. जर अमेरिकेने युद्ध संपवण्याच्या अटी मान्य केल्या नाहीत, तर जागतिक अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची असणारी 'होर्मुझची सामुद्रधुनी' (Strait of Hormuz) पूर्णपणे खुली केली जाईल; अन्यथा अमेरिकन सैन्याला एका भीषण आणि विनाशकारी हल्ल्याला सामोरे जावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. या आक्रमक भूमिकेमुळे संपूर्ण जगाचे लक्ष पुन्हा एकदा व्हाईट हाऊसच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी इराणच्या सरकारी माध्यमांना मुलाखत दिल्यानंतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' (X) वरून आपली भूमिका अधिक आक्रमकपणे मांडली. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांनंतर तिथल्या राजकीय घडामोडी बदलल्या आहेत, असा दावा करत त्यांनी व्हाईट हाऊसला थेट सवाल केला आहे. "अमेरिकेच्या मतदारांनी आपला कौल दिला असून आता प्रशासनाला योग्य मार्ग निवडावा लागेल. जर सर्व आघाड्यांवर युद्ध थांबवण्याची आमची मागणी मान्य झाली, तर त्याचे सकारात्मक पडसाद जगभर उमटतील. पण जर त्यांनी युद्धाचा पर्याय निवडला, तर आमच्या पूर्ण सज्ज असलेल्या सैन्याच्या भयानक हल्ल्यासाठी तयार राहा," असा स्पष्ट इशारा अराघची यांनी दिला आहे.

एकनाथ शिंदेंची घोषणा : मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च आणि शिक्षणाची हमी

मुंबई: दिवाळीचा सण संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरा होत असताना, दुसरीकडे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. जालना येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मदतीची घोषणा केली आहे, त्यांच्या या घोषणेची सर्वत्र चर्चा रंगली आहे. सणासुदीच्या काळात फराळ आणि शिधावाटपापुरते मर्यादित न राहता, थेट शेतकऱ्यांच्या दारात पोहोचून शिंदेंनी त्यांच्या सर्व अडीअडचणींची जबाबदारी स्वीकारली आहे. संकटकाळात हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार देण्यासाठी शिवसेनेकडून मदत करण्यात येत आहे.

मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च आणि शिक्षणाची हमी

जालना दौऱ्यादरम्यान अंबादास तांगडे या शेतकऱ्याच्या घरी भेट दिल्यावर एक अत्यंत भावनिक प्रसंग घडला. तांगडे यांच्या बारावीत शिकणाऱ्या मुलीने पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न व्यक्त केले, तेव्हा मुख्यमंत्री शिंदेंनी तात्काळ तिच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याचे निर्देश दिले. याशिवाय, दुष्काळामुळे ज्या शेतकरी कुटुंबांमधील मुलींची लग्ने रखडली आहेत, त्या सर्व मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च शिवसेना करणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली. आर्थिक संकटात सापडलेल्या तांगडे कुटुंबाने दाखवलेली आपुलकी आणि दिलेली ज्वारी-बाजरीची भेट मनाला हेलावून टाकणारी होती, असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. 574 प्रस्तावित उपाययोजना आणि 16.74 कोटींच्या निधीला प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना 50 हजारांचे प्रोत्साहन अनुदान आणि युनियन बँकेचे 28 कोटींचे कर्ज माफ करण्याच्या कामाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. पीककर्जासह अल्प व दीर्घमुदतीच्या शेतीनिगडित कर्जमाफीच्या मागणीवर मंत्रिमंडळात सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या बँका, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांवर कठोर कारवाईचा इशारा त्यांनी दिला. नदी खोलीकरण, जनावरांचा चारा, चारा छावण्या आणि टँकरचे नियोजन करण्यासाठी घटनास्थळावरच जेसीबी लावण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

पालावरच्या शाळेतील ६० विद्यार्थ्यांची दिवाळी गोड; स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्याकडून मिठाईचे वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दिवाळीचा आनंद सर्वांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या पुढाकारातून पालावरच्या शाळेतील ६० विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. मिठाई मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्साहात दिवाळीचा आनंद साजरा केला.



परराज्यांतून रोजगाराच्या शोधात छत्रपती संभाजीनगरमध्ये आलेल्या कुटुंबांतील मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, या सामाजिक उद्देशाने अनिल मकरिये यांच्या पुढाकारातून पालावरच्या शाळेची सुरुवात करण्यात आली आहे. बीड बायपास परिसरातील एम.आय.टी. कॉलेजजवळील निशांत पार्क येथील गरीब वस्तीत ही शाळा सुरू असून, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून दूर राहणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम येथे केले जात आहे.

या शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण दिले जात आहे. दिवाळीनिमित्त मिठाईचे वाटप करून विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी नगरसेवक पदमसिंह राजपूत, किशोर मानकापे, विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण देणारे शिक्षक राघवेंद्र मेहता तसेच त्यांचे सहकारी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आगमन व स्वागत

छत्रपती संभाजीनगर, दि. 09 (जिमाका) - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आज दुपारी 3 वा.च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमन झाले.त्यांच्या समवेत उद्योग,मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे होते. प्रशासनातर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट,खासदार संदिपान भुमरे, आमदार प्रदीप जैस्वाल,आमदार विलास भुमरे,आमदार हिकमत उढाण,उपमहापौर राजेंद्र जंजाळ, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव आदी उपस्थित होते.







दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

फटाक्यांमुळे उद्भवणाऱ्या आगीच्या दुर्घटना, ठाणे जिल्हा प्रशासनाचा निर्णय

दिवाळीच्या काळात ठाणे जिल्ह्यात आणि विशेषतः रहेजा गार्डन संकुलातील मजल्यावर लागलेली भीषण आग, तसेच कल्याण-ठाण्यातील घरांमध्ये रॉकेट घुसून घडलेल्या दुर्घटना मानवी जीविताला आणि मालमत्तेला किती मोठा धोका निर्माण करू शकतात, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या भीषण दुर्घटनांची गंभीर दखल घेत ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी ९ नोव्हेंबर २०२६ ते ८ जानेवारी २०२७ या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी हवेत उडणाऱ्या रॉकेट व तत्सम फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत वेळोचित आणि स्वागतार्ह आहे. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ च्या कलम ५१ आणि ६० अन्वये जारी करण्यात आलेला हा प्रतिबंधात्मक आदेश केवळ ठाण्यापुरता मर्यादित नसून, नवी मुंबई आणि मुंबईच्या हद्दीतही लागू होणार आहे. सार्वजनिक रस्ते, मैदाने, इमारतींच्या गच्च्या, बाल्कनी किंवा सोसायट्यांच्या आवारात हवेत उडणारे फटाके वाजवण्यास निर्बंध घालून प्रशासनाने सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सणांचा आनंद लुटताना इतरांच्या जीवितास किंवा मालमत्तेस हानी पोहोचणार नाही, याची खबरदारी घेणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. सणांच्या उत्साहात आगीसारख्या आपत्ती ओढवून घेणे आणि निष्पाप नागरिकांचे प्राण धोक्यात घालणे हे अजिबात समर्थनीय ठरू शकत नाही. प्रशासनाने घेतलेला हा कडक निर्णय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठीच असल्याने जनतेनेही प्रशासनाला पूर्ण सहकार्य करणे गरजेचे आहे. केवळ बंदीचे आदेश काढून न थांबता, पोलीस व स्थानिक प्रशासनाने या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी. सण-उत्सव आनंदाने साजरे होत असताना सार्वजनिक शिस्त आणि सुरक्षेचे भान जपणे हीच काळाची गरज आहे.

सारथी फाउंडेशन मानवत कडून 50 निराधार कुटुंबां च्या दारात झाला आनंदाचा प्रकाश

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

परभणी**दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची आरास रांगोळीची शोभा आणि फराळाचा आस्वाद नव्हे तर अंधारावर प्रकाशाचा अज्ञानावर ज्ञानाचा आणि निराशेवर आशेचा विजय साकारणारा मांगल्याचा पर्व म्हणजे सभोवतालच्या झगमगटात समाजातील उपेक्षित वंचित आणि निळधार घटकांच्या आयुष्यातील काळोख दूर करून तेथे आशेची पंथी लावणे हीच दिपवाळीची खरी मानवतावादी शिकवण आहे हीच शिकवण प्रत्यक्षात करतीत उतरत मानवत येथील सारथी फाउंडेशनने दत्त घेतलेल्या 50 निराधार कुटुंबांच्या घरी जाऊन दिपवाली साजरी करत सामाजिक बांधिलकीचा नवा आदर्श निर्माण केला आहे

यावर्षी दुष्काळाची परिस्थिती असल्यामुळे शेतकरी कुटुंबामध्ये दिपवाली कशी साजरी करावा हा मोठा प्रश्न निर्माण उभा टाकला असतानाच अशाच काळात आपले शेजारी कोण आहे याचे भान हरपत चाललेल्या आजच्या काळात सार्थक फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी गल्लीबोळातील गरजू कामगार शेतकरी मजूर त्यांच्या घरापर्यंत जा मायेचा हात दिला स्वतःसाठी नवीन कपडे खरेदी न करता त्याच पैशातून निराधार यांच्या अंगावर नवीन वस्त्र चढवण्यातच या तरुणांनी दिवाळीचा खरा आनंद मानला आहे सहा वर्षापासून माणूस शहरातील दानशूर व्यक्ती आणि फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी सहकार्यातून हा उपक्रम राबवण्यात आला आहे कार्यकर्त्यांनी कोणत्याही औपचारिक कार्यक्रमाचा देखावा न करता थेट गरजू च्या घरापर्यंत उंबरठा ओलांडून मदत पोहोचवली आहे वडिलांचा आधार नसलेल्या 35 चिमुकल्या नवीन कपडे देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले आहे उतार वयात एकाकी जीवन जगणाऱ्या वृद्ध महिला आणि पतीचे छत्र हरवलेल्या 47 भगिनींना नवीन साड्या व गोडधोड दिवाळी फराळाची वाटप करण्यात आली आहे संस्थेचे दत्तक घेतलेले कुटुंबांना जीवनावश्यक आधारस्तंभ दिवाळीच्या गोडवा दिला आहे आपल्या सणाचा काही भाग समाजातील वंचितांसाठी अर्पण करून सारथी फाउंडेशनने माणुसकीची ज्योत तेवत ठेवली आहे कार्यकर्ते जेव्हा फराळ आणि कपडे घेऊन जारात उभे राहिले तेव्हा अनेक वृद्ध माताच्या डोळ्यातून आनंदात सुरू होऊ लागले आमचा कोणी वाली नाही आमची कोणी चौकशी करत नाही अशावेळी मुलासारखी येऊन आमचा सण गोड केला अशा शब्दात एक आजींनी दिलेल्या आशीर्वाद उपस्थितांचे डोळे पानवणारा ठरला आणि त्यांच्या डोळ्यात आनंदात सर्वांनी हृदयात कृतज्ञतापाहून कार्यकर्तेही भारावून गेले होते त्यांच्या नीस्वार्थ दातृत्वाचे आणि संविधान असेल त्याचे मानवत शहरांमध्ये संपूर्ण पंचक्रोशीत कौतुक केले जात आहे.


कर्करोगविरोधी 1,364 औषधांच्या सुधारित एमआरपी लागू


ग्राहकांची वर्षाला ₹3,540 कोटींची बचत

नवी दिल्ली : कर्करोगाच्या रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने (NPPA) कर्करोगविरोधी औषधांच्या कमाल किरकोळ किमतींवरील (MRP) व्यापारी लाभांशाची मर्यादा निश्चित केली आहे. या निर्णयानुसार 1,364 औषध फॉर्म्युलेशन्सच्या सुधारित एमआरपी 9 नोव्हेंबर 2026 पासून लागू झाल्या आहेत. औषधांच्या किमतीत झालेल्या कपातीमुळे ग्राहकांची दरवर्षी अंदाजे ₹3,540.38 कोटींची बचत होण्याची अपेक्षा आहे. रसायन आणि खते मंत्रालयाच्या औषधनिर्माण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या NPPA ने हा निर्णय घेतला आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आरोग्यसेवा महासंचालनालयाने 17 ऑक्टोबर 2026 रोजी स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशींच्या आधारे कर्करोगविरोधी 137 औषधांच्या एमआरपीवरील व्यापारी लाभांशाची मर्यादा निश्चित करण्यात आली.

येडशीतील भीषण आग दुर्घटनेत एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू; संपूर्ण गावावर शोककळा

मुलींना वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या पित्याचाही मृत्यू; करंडे कुटुंबावर काळाचा घाला, एका हसत्या-खेळत्या संसाराची राखरांगोळी






धाराशिव : धाराशिव तालुक्यातील येडशी येथे मध्यरात्री घडलेल्या भीषण आग दुर्घटनेने संपूर्ण गाव हादरून गेले आहे. येथील करंडे गिफ्ट सेंटर व किराणा दुकानाला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेत आपल्या मुलींचे प्राण वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या पित्यालाही आपले प्राण गमवावे लागले. एका क्षणात संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने येडशीसह परिसरात शोककळा पसरली असून, या घटनेने प्रत्येकाचे मन सुन्न झाले आहे.

मध्यरात्रीच्या अग्नितांडवाने घेतले सहा बळी

मिळालेल्या माहितीनुसार, येडशी येथील करंडे गिफ्ट सेंटर व किराणा दुकानाला सोमवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. दुकानाला लागलेल्या आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. आगीच्या ज्वाळांनी दुकानासह शेजारील घरालाही आपल्या कवेत घेतले. मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

आगीची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, आगीची तीव्रता प्रचंड असल्याने बचावकार्यात अडथळे निर्माण झाले. पहाटे पाच वाजेपर्यंत आग धुमसत होती. या अग्नितांडवात घरातील सहा जणांचा दुर्दैवी अंत झाला.

मुलींना वाचवण्यासाठी पित्याचा अखेरचा संघर्ष

या दुर्घटनेतील सर्वाधिक काळीज पिळवटून टाकणारी बाब म्हणजे आपल्या मुलींना आगीच्या विळख्यातून वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या पित्यालाही आपले प्राण गमवावे लागले. मुलींचे जीव वाचविण्यासाठी एका बापाने केलेला शेवटचा संघर्ष आठवला तरी मन हेलावून जाते. आपल्या कुटुंबाला सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सुरू असलेली धडपड अखेर नियतीच्या क्रूर आघातापुढे अपयशी ठरली.

काळाने एका क्षणात संपूर्ण कुटुंबच हिरावून घेतले.

ज्या घरात काही तासांपूर्वी आनंदाचे क्षण होते, त्याच घरात पहाटे मृत्यूचे तांडव घडले. या दुर्घटनेचे दुःख शब्दांत व्यक्त करणे अशक्य असून, करंडे कुटुंबावर कोसळलेला हा दुःखाचा डोंगर संपूर्ण गावाला वेदना देणारा ठरला आहे. या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण येडशी गाव शोकसागरात बुडाले असून, करंडे कुटुंबीयांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू

या भीषण आग दुर्घटनेत उत्तम त्रिंबक करंडे, चंद्रकला उत्तम करंडे, गोविंद उत्तम करंडे, ज्योती गोविंद करंडे, गायत्री गोविंद करंडे आणि सिद्धी गोविंद करंडे या सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. एकाच कुटुंबातील सहा जणांचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने येडशी गावासह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा असा अंत होणे ही कधीही भरून न निघणारी हानी आहे. करंडे कुटुंबातील सदस्यांच्या निधनाने नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

घटनास्थळी धाव; बचावकार्यासाठी यंत्रणांना सूचना

घटनेची माहिती मिळताच पहाटेच घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी करण्यात आली. बचावकार्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. गावकरी, पोलीस प्रशासन आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. या दुर्घटनेत एका तरुणाचा जीव वाचविण्यात यश आले असले, तरी सहा निष्पाप जीवांना वाचवता आले नाही, ही मनाला कायमची वेदना देणारी बाब आहे. या घटनेने संपूर्ण गाव सुन्न झाले असून, दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना धीर देण्याचा प्रयत्न ग्रामस्थांकडून केला जात आहे.

खासदार व आमदारांची घटनास्थळी धाव

या हृदयद्रावक घटनेची माहिती मिळताच खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि आमदार कैलास पाटील यांनी पहाटे घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्घटनेची माहिती घेतली.

येडशी बाजारपेठ बंद; अंत्यसंस्कारासाठी गावात शोककळा

करंडे कुटुंबातील सहा जणांच्या मृत्यूमुळे येडशी गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर दुःख व्यक्त करण्यासाठी गावातील व्यापाऱ्यांनी संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व सहा जणांवर सोमवार, 9 नोव्हेंबर 26 रोजी दुपारी दोन वाजता येडशी येथील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. दिवाळीच्या सणात एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण येडशीसह परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

लेणापूर वाडीवर आदिवासी बांधवांसोबत इद्रिस मुलतानी यांनी साजरी केली दिवाळी

मिठाई वाटप करून दिला आनंदाचा संदेश



सोयगाव,दि. ९ नोव्हेंबर

दिवाळी हा आनंद,उत्साह,आपुलकी आणि सामाजिक एकतेचा सण आहे.या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा,वंचित आणि दुर्गम भागातील नागरिकांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा,या उद्देशाने सोयगाव तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या लेणापूर येथील आदिवासी बांधवांसोबत इद्रिस मुलतानी यांनी दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरा केला.

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या संकल्पनेतून आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण साहेब यांच्या आदेशानुसार 'एक दिवा वंचितांसाठी' या उपक्रमांतर्गत वस्ती,वाड्या,पाडे आणि पालांवर जाऊन समाजातील वंचित घटकांसोबत दिवाळी साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.याच संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरवत इद्रिस मुलतानी यांनी लेणापूर येथील आदिवासी वस्तीला भेट देऊन तेथील बांधवांसोबत दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. यावेळी आदिवासी बांधवांना मिठाईचे वाटप करण्यात आले.सर्वांसोबत संवाद साधत दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.लहान मुले,महिला,ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांच्या चेहऱ्यावरील आनंद या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.शहरांमध्ये आणि गावांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा होणारा दिवाळीचा सण दुर्गम भागातील आदिवासी बांधवांसोबत साजरा करत सामाजिक आपुलकी, बंधुभाव आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला.दिवाळीचा खरा आनंद केवळ रोषणाई,फटाके आणि मिठाईपुरता मर्यादित नसून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आनंद पोहोचवण्यात आहे.समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपणही या समाजाचा एक महत्त्वाचा भाग आहोत,आपलीही काळजी घेणारे लोक आहेत,ही भावना देणे आवश्यक आहे.अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांमधील आपुलकीचे नाते अधिक दृढ होण्यास मदत होते.'एक दिवा वंचितांसाठी' या उपक्रमातून दुर्गम वाड्या-वस्त्यांवर दिवाळीचा प्रकाश पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

लेणापूर येथील आदिवासी बांधवांसोबत साजरी केलेली ही दिवाळी केवळ सण साजरा करण्यापुरती मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी,समता आणि माणुसकीचा संदेश देणारी ठरली.

यावेळी लेणापूर वाडीवरील आदिवासी बांधवांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.सर्वांनी एकत्रितपणे दिवाळी साजरी करत आनंदाचे क्षण अनुभवले.

सेनगाव तालुक्यात खळबळ! लिंगा शिवारात आढळला 6 ते 7 वर्षांचा मृत नर बिबट्या



हिंगोली : सेनगाव तालुक्यातील मौजे लिंगा शिवारात पूर्णा नदीपात्राच्या काठावर अंदाजे सहा ते सात वर्षे वयाचा नर बिबट्या मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. वन्यजीवप्रेमी आणि नागरिकांमध्ये या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, ता ८ रोजी रविवारी सायंकाळच्या सुमारास काही स्थानिक नागरिक नेहमीप्रमाणे गुरे चारण्यासाठी पूर्णा नदीकाठच्या परिसरात गेले होते. यावेळी त्यांच्या निदर्शनास मृत बिबट्या आढळुन आला. नागरिकांनी तत्काळ याची माहिती वनविभागाला दिली. माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने कोणतीही वेळ वाया न घालवता तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळाची पाहणी करून वनविभातर्फे रीतसर पंचनामा व कागदपत्रांच्या नोंदी पूर्ण करण्यात आल्या. त्यानंतर रात्री उशिरा मृत बिबट्याला ताब्यात घेत शासकीय वाहनाद्वारे सेनगाव येथील प्रादेशिक वनपरिक्षेत्र कार्यालयात आणण्यात आले.

शवविच्छेदनातून

ता ९ सोमवारी श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय अधिकारी पथकाकडून नियमानुसार मृत बिबट्याचे शवविच्छेदन करण्यात आले. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्राथमिक निरीक्षणानुसार, मृत बिबट्या नर असून त्याचे वय सुमारे ६ ते ७ वर्षे आहे. प्रथमदर्शनी या बिबट्याचा मृत्यू एखाद्या संसर्गजन्य आजारामुळे झाला असावा, असा दाट संशय व अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार बिबट्याचा देह व नैसर्गिक अवयव नियमांचे पालन करत जाळून नष्ट करण्यात आले.

ही संपूर्ण कारवाई हिंगोलीचे विभागीय वन अधिकारी डॉ. राजेंद्र नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक एस. आर. माने, वनपरिक्षेत्र अधिकारी एम. एस. केंद्रे, मानद वन्यजीवरक्षक डॉ. श्रीधर कंदी, पशुवैद्यकीय अधिकारी एस. बी. देवकर, एस. एस. पठाडे, एस. एम. बुखारी, ग्राम महसूल अधिकारी डी. ए. कापसे, लिंगदरीच्या पोलीस पाटील रविता राठोड, ग्रामसेवक भगवान जाधव यांच्यासह वनपाल पी. टी. केंदळे आणि वनरक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय परिसरातील अनेक ग्रामस्थ व नागरिकही घटनास्थळी उपस्थित होते.

निसर्गसाखळीत वन्यजीव अत्यंत महत्त्वाचे घटक असून त्यांच्या संरक्षणासाठी वनविभाग कटिबद्ध आहे. या प्रकरणी वनविभागाकडून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

24 नोव्हेंबरला कपिलधार बीड येथे शासकीय महापुजा व शिवा संघटनेचा राज्यव्यापी मेळावा

वीरशैव लिंगायत समाजाची प्रभावी व आक्रमक संघटना असलेल्या शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेतर्फे मोठया संख्येने मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन

उरण दि ९(विठुल ममताबादे)शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने प्रतिवर्षी कार्तिक शुध्द पौर्णिमेच्या निमित्त श्री क्षेत्र कपिलधार, ता. जि. बीड येथे होणाऱ्या यात्रेमध्ये 'शासकीय महापुजा' व 'भव्य राज्यव्यापी वार्षिक मेळावा' आयोजित केला जातो. श्री क्षेत्र कपिलधार येथे शिवा संघटनेच्या प्रथेप्रमाणे विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार दिले जातात. त्यामुळे यंदाही दि. २४ नोव्हेंबर २०२६ मंगळवारी ३१ व्या राज्यव्यापी वार्षिक मेळाव्याचे आयोजन केले असुन या मेळाव्याच्या निमित्ताने शिवा संघटनेच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रातील वीरशैव - लिंगायत समाजाच्या मान्यवरांना 'शिवा राष्ट्रीय भुषण पुरस्कार' जाहिर करुन, सन्मान चिन्ह व सन्मान पत्रासह मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ देवुन श्री क्षेत्र कपिलधार येथे यथोचित सत्कार करण्यात येणार आहे. देशातील वीरशैव - लिंगायत समाजात अत्यंत प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या शिवा संघटनेच्या या राष्ट्रीय भुषण पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची निवड 'शिवा' संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर यांनी नुकतीच जाहिर केली आहे. ते पुरस्कार प्राप्त मान्यवर खालील प्रमाणे आहेत.

• शिवा राष्ट्रीय भुषण पुरस्काराची श्रेणी -

०१) उत्कृष्ट शिव कथाकार पुरस्कार - गुरू संगणबसव शिवाचार्य महाराज निलंगेकर, (लातूर) ०२) उत्कृष्ट साहित्यीक पुरस्कार - शिवाजी खंडोजी कांबळे (नांदेड) ०३) उत्कृष्ट शिव किर्तनकार पुरस्कार - शि.भ.प. गोरोबाकाका नरसिंह शिवणे (लातूर) ०३ अ) शि.भ.प. उमाशंकर जगन्नाथ मिटकरी (धाराशिव) ०३ ब) शि.भ.प. कु. पुजा रमेश सातारकर (बु-हानपूर म. प्र) ०४) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट गायन वादक पुरस्कार - शि.भ. प. दिगंबर नागोराव कु-हाडे (नायगाव नांदेड) ०४ अ) शि.भ.प. भुजंगराव शिवमुर्ती पळसकर (परभणी) ०४ ब) शि.भ.प. ओंकार विजयराव काळे (देलगूर नांदेड) ०४ क) शि.भ.प. विकास किसन हसनाळीकर (धर्माबाद नांदेड) ०५) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट अखंड शिवनाम सप्ताह कमेटी - शिवा सिध्देश्वर पावन महादेव मंदिर (छत्रपती संभाजीनगर) ०६) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट वीरशैव भजनी मंडळ पुरस्कार - श्री शिवलिंगेश्वर वीरशैव महिला भजनी मंडळ (परभणी) ०६ अ) निलंबिका वीरशैव भजनी मंडळ (बुलडाणा) ०६ ब) शिवा संघटना तालुका शाखा अक्कलकोट (सोलापूर) ०७) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट शहर शाखा पुरस्कार - शिवा संघटना शहर पुणे - वैजनाथ आपशेट्टी, रोहीदास बेलुरे, प्रदीप हत्ते (सर्व पुणे शहर) ०८) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट गाव शाखा पुरस्कार - शिवा संघटना शाखा, रवि कल्पे, अरविंद सासट्टे (अतनूर जि. लातूर) ०८ अ) शिवा संघटना गाव शाखा पुरस्कार - सिध्देश्वर वाघोले, पंकज पाटील (हंगरगा जि. धाराशिव) ०९) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट सोशल मिडीया कार्यकर्ता पुरस्कार - सदाशिव रामदास आप्पा साखरे (आळंदी पुणे) ०९ अ) शिवानंद बळीराम गंगणे (लोहा, नांदेड) १०) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट शिवा कार्यकर्ता पुरस्कार - कंठयप्पा काशिनाथप्पा मठवाले (कामारेड्डी, तेलंगणा) १० अ) मंगेश प्रल्हाद आप्पा शेटे (लोणार बुलढाणा) ११) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार - आशिष शरदआप्पा चेडगे (साकोली, जि. भंडारा) ११ अ) प्रभाकर दत्तात्रयआप्पा पटणे (छत्रपती संभाजीनगर) १२) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट धर्म प्रचारक पुरस्कार - शि.भ.प. हावगीआप्पा नरसिंग देवणे (लोहा, जि. नांदेड) १३) शिवा राष्ट्रीय भुषण उत्कृष्ट सेवाधारी संस्था पुरस्कार - अशोक भगवानराव जाधव, (नारळीबाग, छत्रपती संभाजीनगर)

याप्रकारे "शिवा राष्ट्रीय भुषण पुरस्कार" शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६ ला घोषित करण्यात आले असुन या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सत्कार मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६ श्री क्षेत्र कपिलधार ता. जि. बीड येथे शिवा संघटनेच्या होणाऱ्या ३१ व्या राज्यव्यापी वार्षिक मेळाव्यात सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व शाल - श्रीफळ देवून शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे व अनेक गुरुवर्य आणि पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा पवार, ना. पंकजा मुंडे, ना. अतुल सावे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी विरोधी पक्ष नेते आ. विजय वडेट्टीवार यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभयराव कल्लावार नागपूर व राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांतआप्पा शेटे पुणे यांनी दिली आहे.वीरशैव लिंगायत समाजाची प्रभावी व आक्रमक संघटना असलेल्या शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेतर्फे मोठया संख्येने मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

ऐन दिपवाळीतआगीच्या चार वेगवेगळ्या घटना

सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**ऐन सणासुदीच्या काळात सगळीकडे दीपावली ची घाई गर्दी असताना शहरात8 नोव्हेंबर रविवार रोजी रात्रीच्या सुमारासणासुदीच्या काळामध्ये आगीच्या चार वेगवेगळ्या घटनांची नोंद झाली असून. सुदैवाने या घटना कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र दुकान व घराचे मोठे नुकसान झाले आहे.

बस स्थानकाजवळील नाल्याजवळ असलेले एका पत्र्याच्या दुकानावरील कचऱ्याने अचानक पेट घेतला आणि आगे ची माहिती महापालिका अग्निशामक दलाला देण्यात आले दुसरी घटना गव्हाणे चौक भागात झुरकर यांच्या घरासमोर भेटली तिसरी घटना सावली रेस्टॉरंटच्या पाठीमागे घडली तर चौथी घटना त्रिमूर्ती नगर येथे साई मंदिर जवळ आग लागली मध्यरात्रीच्या सुमारा सिंचन नगर येथे रघुवीर खरंच यांच्या दुकानाला आग लागली दुकानातील साहित्य जळून खाक झाले अग्निशामक चे दीपक कानोडे निखिल बेंडसोरे मदन जाधव वसीम अखिल अहमद यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली परभणी शहरातील बालाजी नगर भागात रविवारी मध्यरात्री सुमारास एका घराला आग लागली शंकर देशमुख यांनी आजीची माहिती पोलीस नियंत्रण शाळा दिली अग्निशमन दलाला कळले अग्निशमनदानामध्ये चालक उपलब्ध असल्याने गाडी येण्यास दोन ते अडीच तास उशीर झाला त्यामुळे घरातील दुकान घरातील सामान दुकानातील सामान मागच्या दोन खुल्या जळाल्या या सात ते आठ लाख रुपयांचे नुकसान झाले महावितरणचे अधिकारी देखील दीड ते दोन तासानंतर या घटनास्थळी पोहोचल्याने महापालिकेचे अग्निशमन दलात कर्मचारी ची संख्या पुरी असल्यामुळे वाहनाच्या प्रमाणात चालक उपलब्ध नाही त्यामुळे एकापेक्षा जास्त ठिकाणी आगीच्या घटना घडल्यास मोठी अडचण निर्माण होऊ शकते मनपा प्रशासनाने अग्निशामक विभागातील मनुष्यबळाकडे दुर्लक्ष होत आहे दुसरी आज पूर्ण येथील सायकलचे दुकान जवळ पास झाले असून फटाक्याच्या आगीमुळे लागलेल्या आगीत टिळक नगर परिसरातील बसवेश्वर सायकल स्पेअर पार्ट या दुकानाचे फार मोठे नुकसान झाले असून हे आगीत जळून खाक झाले आहेत ही घटना दिनांक 8 नोव्हेंबर रविवार रोजी सायंकाळच्या सुमारास घडले या घटनेत व्यापारी शुभम केदार जाधव यांचे जवळपास दोन लाख रुपयांचे नुकसान झाले असून पूर्ण अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली आग आटोक्यात आणली व महावितरण ने तात्काळ वीज खंडित करून त्यांना सहकार्य केले

राजाबाजार जैन मंदिरात भगवान महावीर निर्वाण महोत्सव भक्तिभावाने साजरा

हजारो भाविकांच्या उपस्थितीत निर्वाण लाडू समर्पण; आचार्य विनम्रसागरजी महाराजांचे मंगल प्रवचन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : भगवान श्री महावीर स्वामी यांच्या निर्वाण कल्याणकानिमित्त राजाबाजार येथील जैन मंदिरात निर्वाण महोत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. परमपूज्य आचार्य भगवंत श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात विविध धार्मिक आणि मांगलिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थित राहून भगवान महावीरांच्या चरणी निर्वाण लाडू समर्पित केले.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५.३० वाजता श्रीजींच्या अभिषेक आणि भव्य शांतिधारेने झाली. सकाळी ६.३० वाजता भगवान महावीर निर्वाण कल्याणक पूजन तसेच निर्वाण लाडू समर्पण सोहळा पार पडला. निर्वाण लाडू समर्पणाचे सौभाग्य अजनाबाई, संगीता, कातीलाल, हेमंत अड आणि गौरव गगवाल परिवाराला लाभले.



सकाळी ८ वाजता आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज यांनी मंगल प्रवचनातून भगवान महावीरांच्या अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि आत्मकल्याण या सिद्धांतांचे महत्त्व विशद केले. मानवी जीवनात संयम, करुणा, त्याग आणि आत्मशुद्धी यांचे महत्त्व सांगत प्रत्येकाने भगवान महावीरांच्या विचारांचा अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आचार्यश्रींचे विशेष पादप्रक्षालन आणि शास्त्रभेटीचा कार्यक्रमही पार पडला.

सायंकाळी ६.३० वाजता समाजबांधवांच्या उपस्थितीत भगवान महावीरांच्या श्रीचरणी दीपसमर्पण करून भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. संगीताच्या मधुर स्वरांत आणि भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांची सांगता झाली.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, महावीर ठोले, अरुण पाटणी, यतीन ठोले, ललित पाटणी, किरण पहाडे, जितेंद्र पाटणी, संतोष सेठी, चंदा कासलीवाल, नीता ठोले, संजय पहाडे, मयूर ठोले, राजकुमार पहाडे, प्रमोद पहाडे, किरण गगवाल, अशोक गगवाल, अनिल कासलीवाल, निकेतन कासलीवाल, महावीर सेठी, पिटू पाटणी, संतोष गगवाल, अभय कासलीवाल, शैलेंद्र सेठी, ताराबाई कासलीवाल, प्रसाद दगडा, नरेंद्र अजमेरा, डॉ. जितेंद्र कासलीवाल, कल्याणमल दगडा, सतीश ठोले, विनय पाटणी, संजय दगडा, दिलीप कासलीवाल, रोहित सोनी, राजाभाऊ पहाडे, संतोष बाकलीवाल, पन्नालाल गगवाल, प्रकाश कासलीवाल, पुजारी प्रवीण काळे, भरत पापडीवाल, रवि पहाडे, काताबाई पहाडे आदी उपस्थित होते.

अधिष्ठाता डॉ. माया इंदूरकर यांना 'बेस्ट प्रेसिडेंट अवॉर्ड'

सामाजिक, शैक्षणिक कार्यासह दंत आरोग्य जनजागृती उपक्रमांची राज्यस्तरावर दखल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठाता तथा इंडियन डेंटल असोसिएशनच्या स्थानिक शाखेच्या अध्यक्षा डॉ. माया संजीव इंदूरकर यांची प्रतिष्ठेच्या 'बेस्ट प्रेसिडेंट अवॉर्ड'साठी निवड झाली आहे. इंडियन डेंटल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य शाखेतर्फे २०२५-२६ या वर्षात संघटनेच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



शुक्रवार, ११ डिसेंबर रोजी नवी मुंबईतील नेरूळ येथील तेरणा डेंटल कॉलेजच्या सभागृहात आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य दंत परिषदेत (एमएसडीसी) हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

डॉ. इंदूरकर यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात दंत आरोग्यविषयक जनजागृती, समाजोपयोगी उपक्रम आणि विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांसाठी वर्षभर राबविण्यात आलेल्या दंत तपासणी शिबिरांच्या उपक्रमाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली. या कार्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली.

या पुरस्काराचे श्रेय इंडियन डेंटल असोसिएशनचे सर्व पदाधिकारी आणि सक्रिय सदस्यांना असल्याची भावना डॉ. माया इंदूरकर यांनी व्यक्त केली. महाविद्यालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहकारी आणि विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

यापुढेही महाविद्यालय रुग्णहित आणि विद्यार्थीहिताला प्राधान्य देत प्रगतीची वाटचाल सुरू ठेवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवउद्योजकांना स्टार्टअप उभारणीसाठी मिळणार प्रशिक्षण

21 नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजातील युवक-युवतींचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकास साधण्याच्या उद्देशाने छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात. याच अनुषंगाने समाजातील युवक-युवतींना उद्योजकतेकडे प्रोत्साहित करण्यासाठी उद्योजकता विकास व इनक्युबेशन कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी दिनांक 21 नोव्हेंबर रोजी सारथीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावेत. या उपक्रमांतर्गत 'स्टार्टअपची कल्पना ते प्रत्यक्ष व्यवसाय' या संकल्पनेवर आधारित उद्योजकता विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाद्वारे नवउद्योजकांना स्टार्टअप सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रशिक्षण तसेच व्यवसायविषयक कौशल्ये विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या व्यावसायिक संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी मदत केली जाणार आहे. या उपक्रमामध्ये निवडक 13 नवउद्योजकांना सहभागी करून घेण्यात येणार असून, त्यांना स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पुणे, कोल्हापूर, संभाजीनगर, सांगली, सातारा, नागपूर आदी ठिकाणच्या युवक-युवतींना या उपक्रमाचा लाभ घेता येणार आहे. अर्ज व उपक्रमासंबंधी सविस्तर माहिती, पात्रता निकष तसेच निवड प्रक्रियेची माहिती सारथीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजातील इच्छुक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेऊन उद्योजकतेच्या क्षेत्रात पुढे यावे, असे आवाहन सारथी संस्थेमार्फत करण्यात आले आहे

उरण महाविद्यालयाची दिवाळी आदिवासी बांधवांसोबत



उरण दि ९(विठ्ठल ममताबादे)कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी पहाट हा कार्यक्रम मागील पंचवीस वर्षापासून आयोजित केला जातो. विकासापासून वंचित असलेल्या समाज घटक दिवाळी सारखा महत्त्वाचा सण आनंदाने साजरा करू शकत नाहीत त्यामुळे दिवाळीत त्यांच्या आनंदाचा भाग व्हावे या उद्देशाने हा उपक्रम राबवला जातो.

यावर्षी पिरवाडी आदिवासी कातकरी वाडी येथील बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मीक गर्जे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी व समाजाप्रती आपलेही काही कर्तव्य आहे ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी तसेच आदिवासी बांधवांचे जीवन विद्यार्थ्यांना समजावे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला असे प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य के. ए.शामा यांनी याप्रसंगी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी या उपक्रमाचा इतिहास सांगितला व विद्यार्थ्यांनी सेवाभावी वृत्ती अंगीकारून मार्गक्रमण केले पाहिजे असे प्रतिपादन केले तसेच माजी विद्यार्थी व महाविद्यालयाने ही परंपरा टिकून ठेवावी असे सांगितले.

याप्रसंगी पिरवाडी आदिवासी कातकरी वाडी वरील महिलांना एकूण बारा वारी साडी ०७, सहावारी साडी ७०, पुरुषांना ७५ टॉवेल्स, व एकूण ६० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व स्वच्छता कीडचे वाटप करण्यात आले. यावेळी वाडीवरील सर्वांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी आर्थिक मदत केली त्यामध्ये प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे,माजी प्राचार्य के.ए.शामा,टी एन घ्यार,विशाल पाटेकर,रोहित पवार, तेजस आठवले इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अशी एकूण जवळपास ७५००० च्या आर्थिक मदतीच्या सहाय्याने कार्यक्रम यशस्वी केला गेला.माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर,नगरसेविका सायली पाटेकर, रोहित पवार,तेजस आठवले, मंगेश म्हात्रे, सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

रायगडमधील सरकारी शाळांची दुरवस्था; 'शाळा वाचवा' अभियानातून शिक्षणाच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी!

उरण दि ९(विठ्ठल ममताबादे)रायगड जिल्ह्यातील सरकारी शाळांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, बाके, वीज आणि शैक्षणिक साहित्य यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे 'शाळा वाचवा' अभियानांतर्गत केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर इंडियन स्टुडंट्स मूव्हमेंटच्या वतीने खालापूर येथील आदिवासी भवनात पत्रकार परिषद घेण्यात आली.



या पत्रकार परिषदेचे अध्यक्षस्थान संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश कदम यांनी भूषविले. यावेळी सविता सोनवणे कदम, राहुल माने, किरण केनी, विशाल पवार आणि संदीप जाधव उपस्थित होते.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी रायगड जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळांना भेटी देऊन शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांकडून माहिती घेतली. अनेक शाळांमध्ये आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचे त्यांनी सांगितले. डिजिटल शिक्षणाच्या घोषणा होत असताना विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागणे ही शिक्षणव्यवस्थेतील विषमता असल्याचे संघटनेने नमूद केले.

पत्रकार परिषदेत शिक्षणाच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी करण्यात आली. शून्य वयापासून पदवीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण, शिक्षणाचे खासगीकरण व बाजारीकरण बंद करणे, सर्वांना समान गुणवत्तेचे शिक्षण, वैद्यकीय व तांत्रिक शिक्षणाच्या समान संधी आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान १५ टक्के निधीची शिक्षणासाठी तरतूद करावी, अशा मागण्या मांडण्यात आल्या.

तसेच स्थानिक आमदार, खासदार आणि प्रशासनाने सरकारी शाळांची प्रत्यक्ष पाहणी करून पायाभूत सुविधांचा अभाव दूर करावा आणि आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

शिक्षण हा प्रत्येकाचा घटनात्मक अधिकार आहे, बाजारातील वस्तू नाही. सरकारी शाळांचे संरक्षण आणि शैक्षणिक समानतेसाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी 'शाळा वाचवा' अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन इंडियन स्टुडंट्स मूव्हमेंटच्या वतीने करण्यात आले.

चटणी भाकर खात केला शासनाच्या धोरणाचा निषेध

वंचित बहुजन आघाडीचा काळी दिवाळीचा संकल्प



हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी**शेतकऱ्यांच्या खात्यावर पाच हजार रुपये टाकून सरकारकडून छोटा करण्यात आली आहे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चटणी भाकर खात सरकारच्या धोरणाचा निषेध करत काळी दिवाळी साजरी करण्याचा आली. दिवाळी हा आनंदाचा सण आणि उत्सवाचा सण आहे यंदा शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक संकटामुळे अंधार झाला असून शेतकरी कुटुंबांना सण साजरा करण्यासाठी आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे या परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांना सन्मान जनक आणि पुरुष आर्थिक मदत देण्याऐवजी पाच हजार रुपये खात्यात टाकून त्यांची घट्ट केली आहे व शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी व त्यांच्या शेतमाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी करत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले यावेळी जिल्हाध्यक्ष प्रमोद कुठे महिला जिल्हाध्यक्ष सुनीता साळवे महासचिव मुजफ्फरखान तालुकाध्यक्ष राऊत रणजीत मकरंद एनजी खंदारेमधुकर बनकर अनिल राठोड सतीश वाकळे दिलीप मोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

लक्ष्मी लाइफ केअर हॉस्पिटलमध्ये रुग्णांसोबत दिवाळीचा आनंदोत्सव

हिंगोली/ गोपाल सातपुते

हिंगोली : दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण. मात्र आजारपणामुळे रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना अनेकदा सणाच्या आनंदापासून दूर राहावे लागते. हीच जाणीव ठेवून लक्ष्मी लाइफ केअर हॉस्पिटल, हिंगोली येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रुग्णांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

या विशेष उपक्रमांतर्गत रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांसाठी स्वादिष्ट भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. विशेष म्हणजे रुग्णालयातील डॉक्टरांनीही रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसोबत एकत्र बसून भोजनाचा आस्वाद घेतला. यामुळे रुग्णालयातील वातावरण आनंदमय आणि कौटुंबिक झाले.



दिवाळीनिमित्त रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसोबत फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला. आजारपणाच्या काळात रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, त्यांना मानसिक आधार देणे आणि आपण एका कुटुंबाचा भाग आहोत, ही भावना निर्माण करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या उपक्रमात डॉ. अखिल अग्रवाल, डॉ. मयूर अग्रवाल, डॉ. प्रदीप राऊत, डॉ. पंजाब शेळके, डॉ. प्राची अग्रवाल आणि डॉ. विजया अग्रवाल यांनी सहभाग घेतला. रुग्णसेवा ही केवळ वैद्यकीय उपचारांपुरती मर्यादित नसून त्यामध्ये आपुलकी, जिव्हाळा, माणुसकी आणि भावनिक आधार यांचाही समावेश असतो, याचे सुंदर उदाहरण लक्ष्मी लाइफ केअर हॉस्पिटलने या उपक्रमातून घालून दिले आहे. रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारी आणि माणुसकीचा दिवा प्रज्वलित करणारी ही दिवाळी हिंगोलीकरांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरली.

कष्टकरी सफाई दूतांचा दिवाळीनिमित्त मिठाई देऊन सन्मान



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी : दिवाळीचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा आणि कष्टकरी कामगारांच्या श्रमांचा सन्मान व्हावा, या सामाजिक भावनेतून बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन व माई वृद्धाश्रमाच्या वतीने आनंदनगर व भारतनगर परिसरातील महानगरपालिकेचे सफाई दूत विजय मिसाळ, ज्ञानेश्वर तायडे व राहुल दाभाडे यांचा मिठाई देऊन सत्कार करण्यात आला. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सफाई कामगारांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीराताई वाघमारे, समाजभूषण रामदास वाघमारे, ऋत्विक वाघमारे व गौरव वाघमारे उपस्थित होते. सफाई कामगारांचा सन्मान म्हणजे त्यांच्या श्रमप्रतिष्ठेचा सन्मान, असा सामाजिक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

दुष्काळाच्या संकटात शिवनेकरांच्या मदतीला शेख सलीम धावले!

संपूर्ण शिवना गावात पाणी टँकर सुरु; नागरिकांना मोठा दिलासा, लोकप्रतिनिधीच्या तत्परतेचे ग्रामस्थांकडून स्वागत

अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील शिवना परिसरात दुष्काळाची तीव्रता वाढत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाने ओढ दिल्यामुळे विहिरी, बोअरवेल आणि अन्य जलस्रोतांची पाणीपातळी खालावली असून नागरिकांना पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे. अशा संकटाच्या काळात शिवना गावातील नागरिकांची पाण्यासाठी होणारी गैरसोय लक्षात घेऊन पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी पुढाकार घेत संपूर्ण शिवना गावात पाणी टँकर सुरू केले आहेत. त्यांच्या या तत्पर निर्णयामुळे गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुष्काळाच्या झळा ग्रामीण भागाला बसू लागल्या असून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकण्याची वेळ आली आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी वेळ न दवडता संपूर्ण गावासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था सुरू केली.



संकटात आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष कृती!

लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची भूमिका शेख सलीम यांनी घेतली आहे. दुष्काळाच्या कठीण काळात गावातील कोणत्याही नागरिकाला पिण्याच्या पाण्यासाठी त्रास होऊ नये, या उद्देशाने संपूर्ण गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत असून त्यांच्या पुढाकाराचे स्वागत केले जात आहे.

दुष्काळ निवारणासाठी प्रशासनानेही पुढाकार घ्यावा!

टँकरद्वारे पाणीपुरवठा हा तात्पुरता दिलासा असला तरी भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना होणे गरजेचे आहे. जलसंधारण, पावसाचे पाणी अडविणे, विहिरींचे पुनर्भरण आणि पाण्याचे योग्य नियोजन यावर प्रशासनाने भर द्यावा. तसेच दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळाच्या कठीण परिस्थितीत संपूर्ण गावाच्या पिण्याच्या पाण्याची जबाबदारी स्वीकारत प्रत्यक्ष मदतीसाठी पुढे आलेले पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांचा हा उपक्रम शिवना गावात चर्चेचा विषय ठरत आहे.

महिला मृत्यू प्रकरण प्रकरणात डॉ डुबेवार सह दोघांना अटकपूर्व जामीन मंजूर

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**ग्रामीण भागातील एका महिला मृत्यू प्रकरणात पांडुरंग हॉस्पिटल मधील डॉक्टर व्यंकटेश डुबीवार सर दोघा डॉक्टरांना जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे सदर या प्रकरणाचा तपास नवा मोंढा पोलीस करत आहेत तपासात मदत करावी व शर्तीच्या अधीन राहून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.

एन्जिओप्लास्टी करताना डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे आपल्या आईचा मृत्यू झाला व तसेच उपचाराच्या नावाखाली पैसे उकळले व सीसीटीव्ही फुटेज बाबत चुकीची माहिती देणे या फसवणुकीच्या केल्याचा आरोप फिर्यादीने केला होता न्यायालयाच्या आदेशानंतर 17 ऑक्टोबर रोजी डॉव्यंकटेश डुबेवार डॉ सागर चिऊलवार डॉ व्यंकटेश हराळे यांच्यावर न्यायालयाचे आदेशाने पुण्याची नोंद झाली होती भाऊसाहेब झोल यांनी तक्रार दिली होती सदर प्रकरणात स्थगिती देखील डॉक्टरांकडून आणण्यात आली होती पुन्हा गुन्हा नोंद झाल्यानंतर सदर डॉक्टरांनी अटकपूर्व जामीन मिळावे यासाठी परभणी जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता न्यायालयाने या प्रकरणात डॉ व्यंकटेश डुबेवारसह दोघांना अटकपूर्व जामीन मंजूर केला असून मागील आठवड्यात याबाबत न्यायालयाने आदेश दिल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे महिला प्रकरणात तपासामध्ये मदत करावी चौकशीसाठी बोलावले तेव्हा यावे व इतर अटीच्या अधीन राहून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.















मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911